# पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

## ३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१

पीबीएक्स ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४ फॅक्स ०२०-२६१२७००७/२६१३२४०१

Email :- dirmktms@gmail.com  Web:- mahapanan.maharashtra.gov.in


**तात्काळ / महत्वाचे**  १०५७

जा.क्र.पणन-५/परिपत्रक/करोना/प्रतिबंधक- उपाययोजना/ /२०२०

पुणे, दिनांक :- २४/०३/२०२०

**विषय :- राज्यात कोरोना विषाणू (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजना म्हणून बाजार आवारातील अनावश्यक गर्दी कमी करण्यासाठी पोलीस यंत्रणेची मदत घेणेबाबत**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे जा.क्र.पणन-५/परिपत्रक/९४७/सन २०२० दि.१६ मार्च २०२० चे परिपत्रक

२) सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१४ मार्च २०२० रोजीची अधिसुचना

३) या कार्यालयाचे जा.क्र.पणन-५/परिपत्रक/१००७/सन २०२० दि.१९/०३/२०२० चे परिपत्रक

४) शासन निर्णय क्रमांक समय -२०२० /प्र.क्र.३५/१८ (र.व.का.) दि.२०/०३/२०२०

५) या कार्यालयाचे जा.क्र.पणन-५/ परिपत्रक/ कोरोना / प्रतिबंध उपाययोजना/ १०२४/२०२० दिनांक २३/०३/२०२०

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भिय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ मार्च,२०२० च्या अधिसुचनेव्दारे नागरिकांना लागणा-या अत्यावश्यक सेवा उदा. बँक सेवा,औषधे,भाजीपाला, किराणा,दूध इत्यादी अत्यावश्यक बाबींची दुकाने चालु राहतील याबाबत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

कृषि उत्पन्न बाजार समितीत्यांमध्ये जीवनावश्यक मालाची खरेदी विक्री सुरळीतपणे सुरु राहण्याच्या दृष्टीने बाजार समित्यांना या कार्यालयाने वेळोवेळी परिपत्रकीय सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

कोरोना विषाणू (COVID-19) प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाय योजना करण्याच्या दृष्टीने बाजार आवारातील गर्दी कमी करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुढीलप्रमाणे अधिकच्या सुचना देण्यात येत आहेत.

१) बाजार आवारात कमीत कमी गर्दी राहील या दृष्टीने आपले स्तरावर योग्य त्या उपाय योजना करण्यात याव्यात.सदरकामी पोलीस यंत्रणेची तातडीने मदत घेऊन बाजार आवारात कमीत कमी गर्दी होईल याची खबरदारी घ्यावी.या संदर्भात कोणतीही अडचण आल्यास संबंधित जिल्हाधिकारी यांचेशी तात्काळ संपर्क साधावा.

२) बाजार आवारामध्ये शेतमालाची एकदम आवक होणार नाही व जेणेकरुन बाजार आवारात एकदम गर्दी होणार नाही या दृष्टीने संबंधित बाजार घटकांशी समन्वय ठेऊन आपले स्तरावर नियोजन व अंमल करावा.

मा.पणन संचालक
यांचे मान्यतेने }

२८/३/२०२०

**(राजकुमार पाटील)**
**उपसंचालक,(पणन)**
**महाराष्ट्र राज्य,पुणे**

प्रति:

१) सभापती/सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती ,--------- (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था --------(सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,----------(सर्व)

उपरोक्त सूचनांची काटेकोर अंमलबजावणी आपल्या जिल्हयातील बाजार समित्या करतील,याची जबाबदारी आपली राहील.

प्रत माहितीस्तव सस्नेह :

१) मा.विभागीय आयुक्त (सर्व)
२) मा.जिल्हाधिकारी (सर्व)
३) मा.जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
४) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ,पुणे
५) मा.मंत्री,सहकार व पणन यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री,पणन यांचे खाजगी सचिव

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

१) मा.प्रधान सचिव (पणन), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई-३२
२) मा.सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे